DEVELOPMENTAL DISABILITIES ADMINISTRATION (DDA)

# वय वर्षे चार (4) पात्रता मुदतसमाप्तीची सूचना

## Notification of Age Four (4) Eligibility Expiration

ग्राहकाचे नाव आणि पत्ता

प्रतिनिधीचे नाव आणि पत्ता

उत्तर: **वय वर्षे चार (4) पात्रता मुदतसमाप्तीची सूचना**

तुमचे मूल सध्या डेव्हलप्मेंटल डिसेबिलिटीज ॲडमिनिस्ट्रेशन [विकसक विकलांगता व्यवस्थापन] (DDA)चे ग्राहक आहे. बर्थ-टू-थ्री उपक्रम किंवा मेडिकली इंटेंसिव्ह चिल्ड्रन उपक्रमामधील त्याच्या/ तिच्या नावनोंदणीमुळे तो/ ती DDA मध्ये पात्र झाला/ झाली असेल. तुमच्या मुलाची DDA मधील पात्रता त्याच्या/ तिच्या चौथ्या वाढदिवसाबरोबर संपते. तुमचे मूल DDA साठी पात्र राहण्याकरता, तुमचे मूल चार वर्षांचे होण्याआधी तुम्ही पुन्हा अर्ज केला पाहिजे. जोडलेल्या आवश्यक दस्तावेजीकरण त क्त्यामध्ये सूचीबद्ध केलेल्या कोणत्याही एका स्थितीमुळे तुमचे मूल पात्र असल्याचे पुन्हा निर्धारित केले गेले पाहिजे.

**पुन्हा अर्ज कसा करायचा:**

पुन्हा अर्ज करण्याच्या पॅकेटची विनंती करण्यासाठी तुमच्या मुलाच्या चौथ्या वाढदिवसाआधी किमान 90 दिवस DDA इंटेक ॲंड एलिजिबिलिटी कर्मचारीवर्गाचा संपर्क साधा. तुम्ही हे लेखी स्वरूपात किंवा खाली सूचीबद्ध केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर दूरध्वनी करून करू शकता. अर्ज करण्याचे पॅकेट तुम्हाला पोस्टाने पाठवले जाईल. https://www.dshs.wa.gov/dda/consumers-and-families/eligibility येथे जाऊन ही तुम्ही अर्ज करण्याचे दस्तावेज ऑनलाईन पद्धतीने मिळवू शकता.

**मी पुन्हा अर्ज केला नाही तर काय?**

जर किमान 60 दिवस आधी तुम्ही पुन्हा अर्ज करण्याच्या पॅकेटची विनंती केली नाहीत किंवा तुम्ही अर्ज परत केला नाहीततर तुमच्या मुलाची DDA सहची पात्रता त्याच्या/ तिच्या चौथ्या वाढदिवशी संपेल. तुमच्या मुलाला DDA सह पैसे भरून सेवा मिळाली, तर ही सेवा त्याच्या/ तिच्या चौथ्या वाढदिवशी संपेल.

**DDA पात्रतेच्या मुदतसमाप्तीचा विशेष शिक्षण उप क्रमांतील सहभागावर किंवा SSI पात्रतेवर परिणाम होणार नाही. तसेच त्याचा तुम्हाला मिळू शकत असलेल्या कोणत्याही दुसऱ्या DSHS सेवेवर परिणाम होणार नाही, जसे की मेडिकएड, TANF किंवा जेवणाचे स्टॅम्प्स.**

कृपया लवकरात लवकर प्रतिसाद द्या, परंतु तुमच्या मुलाच्या चौथ्या वाढदिवसाच्या किमान 90 दिवस आधी. आम्हाला तुमचे उत्तर न आल्यास, आम्ही गृहित धरू की तुमच्या मुलाची DDA सहची पात्रता चालू ठेवण्याची तुमची इच्छा नाही. वय वर्षे चार (4) पर्यंत योग्य पात्र स्थितीच्या दस्तावेजीविना तुमच्या मुलाची DDA पात्रता आणि DDA सेवा त्याच्या/ तिच्या चौथ्या (4थ्या) वाढदिवशी संपतील.

तुम्हाला प्रश्न असल्यास किंवा पॅकेटसाठी विनंती करण्याची तुमची इच्छा असल्यास, तर येथे संपर्क साधा

| नाव | दूरध्वनी क्रमांक | ईमेल पत्ता |
|---|---|---|

पात्रता निर्धारित करण्याच्या राज्याच्या नियमांची एक प्रत https://www.dshs.wa.gov/dda/consumers-and-families/eligibility येथे विनंतीवरून किंवा ऑनलाईन उपलब्ध आहे.

CC: ग्राहक फाईल

**आवश्यक दस्तावेजीकरण तक्ता**

| विकलांगता स्थिती | वय | निदान | निदानतज्ञ | इतर नोंदी |
|---|---|---|---|---|
| विकासात उशीर | वय 4 ते 9 | विकासात उशीर | एक व्यावसायिक व्यक्ती जी विकासविषयक मूल्यनिर्धारणे किंवा मूल्यांकने देण्यास पात्र असेल | वय 4 ते 9 – गेल्या 12 महिन्यांच्या आतील एका मूल्यनिर्धारण प्रवाहावर आधारित -1.5 SD मध्ये तीन किंवा अधिक वेळा उशीर किंवा कालक्रमाच्या वयाच्या 25 %. |
| वैद्यकीय सेवेची तीव्र गरज असलेले | जन्मापासून 17 | | | मेडिकली इंटेंसिव्ह चिल्ड्रन उपक्रमासाठी पात्र. |
| बौधिक विकलांगता | वय 4 आणि त्याहून जास्त | बौधिक विकलांगता (पूर्वीची मानसिक प्रगतीरोध) | परवानाधारक मानसशास्त्रज्ञ, वॉशिंगटन सर्टिफाईड स्कूलचे मानसशास्त्रज्ञ किंवा नॅशनल असोशिएशन ऑफ स्कूल सायकॉलॉजिस्ट्स ने प्रमाणित असलेल्या इतर स्कूलचे मानसशास्त्रज्ञ | सरासरीखाली दोन प्रमाणित फरकांहून जास्त फुल स्केल IQ गुणांकाच्या समावेशासह संपूर्ण मानसशास्त्रीय अहवाल, आणि सरासरीखाली दोन प्रमाणित फरकांहून जास्त असलेला अनुकूलन कौशल्ये गुणांक. |
| सेरेब्रल पाल्सी | वय 4 आणि त्याहून जास्त | सेरेब्रल पाल्सी<br>क्वाड्रिप्लेगिया<br>हेमीप्लेगिया<br>डिप्लेगिया | परवानाधारक फिझिशियन | वय वर्षे 3 च्या आधी सुरुवात, आणि दोन किंवा अधिक विभागांमध्ये (शौचाला जाणे, अंघोळ करणे, खाणे, कपडे घालणे, फिरणे, किंवा संप्रेषण) दैनंदिन थेट शारीरिक मदतीच्या गरजेला आधार देणारी माहिती. |
| अपस्मार | वय 4 आणि त्याहून जास्त | अपस्मार किंवा आघात समस्या | मंडळाने प्रमाणित केलेले मज्जातंतुविशेषज्ञ | वैद्यकीय इतिहास आणि मज्जातंतुसंबंधी चाचण्यांवर आधारित निदान, अनियंत्रित आणि चालू किंवा पुन्हा पुन्हा होणाऱ्या आघातांची फिझिशियन किंवा मज्जातंतुविशेषज्ञांद्वारे पुष्टी, आणि अनुकूलन कार्यामध्ये सरासरीखाली दोन प्रमाणित फरकांहून जास्त महत्वाच्या मर्यादा दाखवणारी अनुकूलन कौशल्ये चाचणी. |
| ऑटिझम<br>(DSM-IV प्रमाणे) | वय 4 आणि त्याहून जास्त | ऑटिझम किंवा ऑटिस्टिक समस्या<br>DSM-IV-TR मध्ये 299.00 प्रमाणे | A परवानाधारक मानसशास्त्रज्ञ, ऑटिझमशी निगडित ऍड्व्हान्स्ड रजिस्टर्ड नर्स प्रॅक्टिशनर (ARNP) किंवा विकास केंद्र किंवा मंडळाने प्रमाणित केलेले: मज्जातंतुविशेषज्ञ, मनोदोषचिकित्सक, किंवा विकास आणि वर्तणुकविषयक बालरोगतज्ञ | सर्व निदानात्मक निकष पूर्ण करणारे DSM-IV प्रमाणे संपूर्ण मूल्यांकन, उशीर झाल्याचा पुरावा किंवा सामाजिक, भाषा, संप्रेषण कौशल्ये किंवा सांकेतिक किंवा काल्पनिक खेळामध्ये वय वर्षे 3 च्या आधी असामान्य कार्ये, आणि अनुकूलन कार्यामध्ये सरासरीखाली दोन प्रमाणित फरकांहून जास्त महत्वाच्या मर्यादा दाखवणारी अनुकूलन कौशल्ये चाचणी. |
| ऑटिझम स्पेक्ट्रम समस्या<br>(DSM-V प्रमाणे) | वय 4 आणि त्याहून जास्त | ऑटिझम स्पेक्ट्रम समस्या 299.00<br>DSM-5 प्रमाणे, दोन्ही रकान्यांमधील तीव्रता पातळ्या 2 किंवा 3 च्या समावेशासह | परवानाधारक मानसशास्त्रज्ञ, ऑटिझमशी निगडित ऍड्व्हान्स्ड रजिस्टर्ड नर्स प्रॅक्टिशनर (ARNP) किंवा विकास केंद्र किंवा मंडळाने प्रमाणित केलेले: मज्जातंतुविशेषज्ञ, मनोदोषचिकित्सक, किंवा विकास आणि वर्तणुकविषयक बालरोगतज्ञ | सर्व निदानात्मक निकष पूर्ण करणारे DSM-V प्रमाणे संपूर्ण मूल्यांकन, उशीर झाल्याचा पुरावा किंवा सामाजिक, भाषा, संप्रेषण कौशल्ये किंवा सांकेतिक किंवा काल्पनिक खेळामध्ये वय वर्षे 3 च्या आधी असामान्य कार्ये, आणि अनुकूलन कार्यामध्ये सरासरीखाली दोन प्रमाणित फरकांहून जास्त महत्वाच्या मर्यादा दाखवणारी अनुकूलन कौशल्ये चाचणी, आणि सरासरीखाली एका किंवा अधिक प्रमाणित फरकाचे FSIQ – किंवा – DSM-IV प्रमाणे ऑटिस्टिक समस्या 299.00 चे सर्व निकष पूर्ण करणे. |
| दुसरी मज्जातंतुसंबंधी किंवा बौधिक विकलांगतेसारखी इतर स्थिती | वय 4 आणि त्याहून जास्त | मज्जातंतुसंबंधी किंवा क्रोमोझोमसंबंधी समस्या ज्यामुळे बौधिक आणि अनुकूलन कौशल्यांमध्ये कमतरता होण्याचे ज्ञात आहे | परवानाधारक फिझिशियन | सरासरीखाली 1.5 प्रमाणित फरकांहून जास्त फुल स्केल IQ गुणांक, आणि अनुकूलन कार्यामध्ये सरासरीखाली दोन प्रमाणित फरकांहून जास्त महत्वाच्या मर्यादा दाखवणारी अनुकूलन कौशल्ये चाचणी. |

**टीप: हे प्रपत्र केवळ एक सर्वसामान्य मार्गदर्शक आहे आणि DDA साठी अतिरिक्त माहिती किंवा मूल्यनिर्धारणाची आवश्यकता असू शकते. हे दस्तावेजीकरण पात्रता ठरवण्यातील पहिले पाऊल आहे. DDA पात्रता WAC धडा 388-823 प्रमाणे ठरवली जाते.**